शिविम

मराठी

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

विद्वत्प्रमाणित, यु.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक

(Peer Reviewed Referred Research Journal)

ISSN No. 2319-6025

# शिविम संशोधन पत्रिका

वर्ष-नववे : अंक तेविसावा । जुलै ते सप्टेंबर २०२०



डॉ. पुष्पा भावे

विनम्र अभिवादन !

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal )

ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली, मान्यता अ. क्र. ६४१७५)

**वर्ष-नववे : अंक तेवीसावा**

जुलै - सप्टेंबर २०२०

संपादक

**डॉ. शिवकुमार सोनाळकर**

कार्यकारी संपादक

**डॉ. नीला जोशी**

संपादक मंडळ

**डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. तातोबा बदामे, डॉ. दिनेश वाघुंबरे**

सल्लागार समिती

**डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. अनिल गवळी**

**प्रकाशक**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१६ ०११

**मुद्रक**

भारती मुद्रणालय

८३२ ई वॉर्ड, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर. फोन : (०२३१) २६५४३२९

मूल्य : रु. १००/-

# अंतरंग

संपादकीय / डॉ. नीला जोशी ........................................ ३
सामाजिक चळवळी व लेखनाचा प्रागतिक वारसा / डॉ. रणधीर शिंदे ............ ५
'बोलावे ते आम्ही': व्यापक विश्वभानासाठीचा आग्रही संवाद / डॉ. रफिक सूरज १२
सातपाटील कुलवृत्तांत : कुतूहल वाढवणारी कादंबरी / डॉ. एकनाथ आळवेकर.. १८
माणदेश : दरसाल दुष्काळ - भूसांस्कृतिक दस्तऐवज / डॉ. मानसी जगदाळे..... २३
परिघावरच्या वंचित नायकाचा शोकात्म स्वर : फेसाटी / डॉ. सागर लटके ...... ३१
दलित वैचारिक साहित्य / डॉ. अरुण शिंदे ........................................ ३८
वैचारिक वाङ्मय : विचार व विचारवंत / डॉ. महेश गायकवाड ................ ४९
यशवंतराव चव्हाण यांचा साहित्यिक पत्रव्यवहार / डॉ. धनंजय होनमाने ......... ५८
मराठी लोककला आणि लोकनाट्य / डॉ. संग्राम थोरात ........................ ६५
फार्स : प्रहसन की हास्यात्मिका ? / डॉ. आनंद बल्लाळ........................... ७६
बारी : रुप आणि अविष्कार / प्रा. डॉ. आबासाहेब शिंदे ........................ ८४
प्रवासवर्णनांचे स्त्रीवादी आकलन / प्रा. वैशाली गुंजेकर............................ ९३
प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचे स्वरूप / डॉ. प्राजक्ता निकम .................... ९८

सूचना : पत्रिकेत प्रसिद्ध होणाऱ्या लेखकांच्या मतांशी संपादक मंडळ वा शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ सहमत असतीलच, असे नाही.

 ISSN No. 2319-6025

# सातपाटील कुलवृत्तांत : कुतूहल वाढवणारी कादंबरी

डॉ. एकनाथ आळवेकर

रंगनाथ पठारे हे मराठीतील महत्त्वाचे लेखक म्हणून नावारूपाला आलेले लेखक आहेत. 'दिवे गेलेले दिवस' ही त्यांची १९८२ साली प्रसिद्ध झालेली पहिली कादंबरी आहे. त्यानंतर त्यांनी अनेक विषयांवर कादंबऱ्या लिहिल्या आहेत. एकूण चौदा कादंबऱ्यांचे लेखन त्यांनी आत्तापर्यंत केले आहे. त्यातील काही दीर्घ स्वरूपाच्या कादंबऱ्या आहेत. 'सातपाटील कुलवृत्तांत' ही शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांनी जुलै २०१९ मध्ये प्रकाशित केलेली दीर्घ कादंबरी आहे. या कादंबरीचा लेखक कादंबरीत निवेदक म्हणून आलेला आहे. मराठा जातीत जन्मलेल्या या गर्भित लेखकाने आपल्या कुळाचा शोध घेण्याचा प्रयत्न या कादंबरीतून केला आहे. सातशे वर्षे मागे जाऊन तो लेखक आपला कुलवृत्तांत कथन करतो. अनेक टप्प्यांवर हा शोध घेताना तो लेखक जाती, धर्म, मानवी नाती आणि मानवी समूहांचे मिसळणे कसे असते याबद्दलचा अनुभव कथन करतो. मानवी आत्मभान काय असते हे या कादंबरीच्या निमित्ताने समजते.

प्रस्तुत कादंबरी श्रीपती, साहेबराव, दसरत, जानराव, रखमाजी आणि पिराजी, शंभुराव, देवनाथ अशा सात शीर्षकभागात विभागलेली आहे. तरीही हे भाग काळाने, नात्याने, धर्माने, जातीने, संस्कार, संस्कृतीने, प्रथा परंपरेने एकमेकांशी बांधलेले आहेत. सातपाटील घराण्याच्या वेगवेगळ्या कालखंडातील पिढ्यांतील मुख्य पुरुष हे या कादंबरीचे नायक आहेत. श्रीपती सातवाहन कालखंडातील, साहेबराव निजामशाहीच्या राजवटीतील, दसरत पेशवाईच्या कालखंडातील, जानराव ईस्ट इंडिया कंपनीच्या साम्राज्यविस्ताराच्या कालखंडातील, रखमाजी आणि पिराजी ब्रिटिश राजवट काळातील, शंभुराव पहिल्या जागतिक महायुद्धा दरम्यानच्या काळातील, देवनाथ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आहे. राजकीय स्थित्यंतराचे असे टप्पे कादंबरीकाराने निवडले आहेत. थोडक्यात, मध्ययुगीन महाराष्ट्र ते स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महाराष्ट्र असा मोठा टप्पा या कादंबरीमध्ये येतो.

देवगिरीच्या यादवराजे कालखंडातील श्रीपती पैठणपासून जवळ असलेल्या डोंगरकिनी गावचा असतो. त्याच्या बापाने त्याला घोडा घेऊन पाठविले होते. रस्त्याने मेण्यातून जाणाऱ्या मानकरीन (देशमुखीन) बाईच्या मुलाला वज्रसेनला श्रीपती आपल्या मेंढीचे दूध पाजतो. त्या बाळाला मेंढीचे दूध पचनी पडत असल्याने त्याला मेंढीसह वाड्यावर बोलवितात तिथे तो पहारेकऱ्याची नोकरी करतो. ते बाळ देशमुखीनीचा

लग्नापूर्वीचा प्रेमी सहस्रसेन याच्यापासून झालेले असते. दरम्यान सहस्रसेन बऱ्याच वर्षांनी देशमुखीनीला भेटायला आला असताना पहारेकरी असणाऱ्या श्रीपतीकडून स्वसंरक्षणार्थ मारला जातो. देशमुखीनीचा पती केशीराज एडके याला संसारात रस नसतो. श्रीपतीवर जीव जडलेली देशमुखीन श्रीपतीला घेऊन वांबोरी गावी येते.

आवडणाऱ्या पुरुषावर विश्वास ठेवून, त्याच्या कर्तृत्वावर भाळून, त्याच्यावर प्रेम करणाऱ्या स्त्रिया इतिहासकाळापासून पाहायला मिळतात. श्रीपतीच्या कर्तृत्वावर प्रेम करणारी देशमुखीन आढळते. कादंबरीतील साहेबराव निजामशहाच्या कालखंडातील असून वांबोरी गावची पाटीलकी एडके घराण्याकडे असते. वज्रसेन एडके घराण्याचा मूळ पुरुष असतो. वांबोरीत पठारे, रहाणे, शितोळे, चौथे, शुकरे, तिडके, एडके अशा सात आडनावाचे लोक राहात असतात. यातील तिडके आणि एडके ब्राह्मण तर बाकीचे मराठा असतात.

पठाणांनी पळविलेल्या एडके पाटलांच्या मुलीची (गीताची) सुटका करण्यासाठी सातजण जातात. त्या तिन्ही पठाणांना ते मारतात. सातजणांपैकी रहाणे दौलतखानाकडे जाऊन पठाणांना मारणाऱ्यांना जीवदान देण्याविषयी सांगतो. सलाबतखान त्या सातजणांना शिक्षा म्हणून वेगवेगळी कामे देतो. साहेबराव सैन्यात असतो. त्यावेळी साहेबराव बहरामखानाची बायको आर्यानाची दासी म्हणून असलेल्या गीताची सुटका करतो. ते सातजणही सुटतात. त्यावेळी बक्षिसी म्हणून एडके पाटील त्या सात घराण्यात पाटीलकीचे वाटप करतो. त्यापासून सातपाटील हे आडनाव लावले जाते.

साहेबरावला 'राह देखूंगी' असे सांगितलेले पठाणबाई आर्यांना गुरबतखान या दिराच्या भीतीने साहेबरावला घेऊन पुणे प्रांतातील खराडी या गावी येते. तिच्यासोबत आर्यन नावाचा मुलगा असतो. आर्यानाची आरेना होऊन ती स्वत:ला मऱ्हाटा समजू लागते. तिथे साहेबराव जहागिरदार इम्रानखानला भेटून नापिकावू जमीन घेऊन शिवरामबुवाच्या सहकार्याने गाव वसवितो. गावात बारा बलुतेदार येतील अशी व्यवस्था करतो. गावात तालीम, मारुती मंदिर यांची रचना करतो. मराठ्यांच्या अधिपत्याखाली नव्याने गावगाडा निर्मितीचे कार्य कसे केले जाते याचे चित्रण यानिमित्ताने कादंबरीत पाहायला मिळते. पुढे आर्यनचा विवाह शिवरामबुवाच्या नातीशी-मर्दिनीशी होतो. आरेनरावाला दोन गावाची देशमुखी मिळते. सातपाटलाचे घराणे आरेनराव साहेबराव सातपाटील यांच्यापासून सुरू होते. त्या अफगाण मुलाला मराठी टिळा पठारे यांच्या कुळीचा लागला. पुढे आरेना आणि साहेबराव अफगाणला स्थलांतरित होतात. अशाप्रकारे साहेबरावचा प्रवास वांबोरी ते खराडी आणि अफगाणिस्तान असा होतो.

पेशवाईच्या कालखंडातील दसरत रानबा सातपाटील यांचा थोरला मुलगा असतो. चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या चुलत भावाचा खून केल्यानंतर दसरत खराडीतून



ISSN No. 2319-6025

बाहेर पडतो. दत्ताजी शिंदे यांच्या फौजेत सामील होतो त्यावेळी छावणीसोबत असणारी तुळसामायशी त्याला सांभाळते. लढाईत पराभव होत असल्याचे पाहून दसरत पळून जातो. अफगाण सैनिकाचे कपडे परिधान करून एका ठिकाणी आश्रयाला गेला असता तिथे फसवणूक होताना ध्यानात आल्यावर बाहेर पडतो. पुन्हा खराडीला पोहोचतो. खराडीत दसरतची बायको-मुले सुरक्षित असतात. पुन्हा शिंद्यांच्या छावणीत सामील होतो. युद्धातून पळून गेल्याचे शल्य त्याला पुसायचे असते. भाऊसाहेब पेशव्यांच्या सैन्याबरोबर उत्तरेला जातो. पानिपतच्या पराभवानंतर झोरावर या नावाने अफगाणिस्तानात झोरावरच्या घरी पोहचतो. पण झोरावरची पत्नी आफिया तो मराठी असल्याचे ओळखते ती दसरतला घेऊन त्याच्या मऱ्हाटी मुलुखात येते ती पुढे आफुबाई होते. तिच्यासोबत विठ्ठलरखुमाईची मूर्ती घेते. त्या मूर्तीच्या पायावर 'साहेबराव आणि आरेनाबाई यांना शिवरामबाबांकडून आपल्या मुलखाची आठवण म्हणून', असे लिहिलेले असते. अफगाणिस्तानाकडचे गाव साहेबराव-आरेनाने वसविले होते. दसरत-आफिया करंजे येथे येतात.

सातपाटील घराण्यातील जानराव ईस्ट इंडिया कंपनीच्या साम्राज्य विस्ताराच्या कालखंडातील म्हणजे दुसऱ्या बाजीरावाच्या कालखंडातील असतो. दसरत पाटलाचा नातू असलेला जानराव दुसऱ्या बाजीरावाच्या फौजेत असतो. फौजेतून बाहेर पडून कचरू या मित्राच्या सालपी या गावी येऊन रिकामे झालेले गाव पुन्हा वसवतो. गावात गावगाड्यातील सर्व घटक हळूहळू जमा होतात. आफुआजीला सांगून जानराव करंजेहून साल्पीत कुटुंब घेऊन येतो. सोबत विठ्ठलरखुमाईची मूर्ती असते. 'मुलुखागिरीला बाहेर पडणं ही सातपाटील लोकांची मूळप्रवृत्ती आहे' (पृ.३९६). असे कादंबरीचा निवेदक सांगतो. जानरावला रखमाजी आणि पिराजी अशी दोन मुले असतात. साल्पीत जानरावने ओढा अडवून जमीन बागायती केली. पंचक्रोशीत जानरावचा वचक असतो. जानरावच्या कालखंडातील काही वेदनादायी प्रसंगाचे चित्रणही आले आहे.

रखमाजी आणि पिराजी यांचा ब्रिटिश राजन्टीचा म्हणजे व्हिक्टोरिया राणीचा कालखंड असतो. रखमाजी शेतात राबणारा तर पिराजी त्याच्या ताकदीने 'पीरादादा' म्हणून ओळखला जातो. पिराजीने उल्फी ही कोल्हाट्याची पोर उचलून आणलेली असते. पिराजीवर कुणीतरी विषप्रयोग केलेला असतो. त्या अवस्थेत तो उल्फी आणि मुलाला बाहेर पडायला सांगतो. उल्फी बलाकासीमित या इंग्रजी अधिकाऱ्याच्या नजरेस पडते ते तिला आश्रय देतात. तिला मुलासह स्वीकारून तिच्याशी लग्न करून दोघे इंग्लंडला जातात. रखमाजीचा शेवटचा मुलगा शंभुराव व्हर्नाक्युलर फायनलपर्यंत शिकलेला असतो. शंभुरावचे लग्न होते. विठ्ठल-रखुमाईची मूर्ती त्यांच्या वाट्याला येते. शंभुरावचा सुद्धा आजूबाजूच्या परिसरावर दबदबा असतो. भक्कम शरीरयष्टी असलेले सातपाटील

ISSN No. 2319-6025

पुरुष, त्यांचे धाडस, कर्तृत्व, शौर्य यांमुळे त्या घराण्याचा वचक कायम असल्याचे ध्यानात येते. शंभुरावला, पत्नी तेजबाईकडून मुले होत नाहीत पण तेजबाई स्वत: तुळसाबाई हिच्याशी शंभुरावचे लग्न लावून देते. त्यांना पाच मुले आणि दोन मुली होतात.

शंभुराव हा पहिल्या जागतिक महायुद्धाच्या काळातील असतो. शंभुरावकडे नेतृत्वगुण असते. कौशल्यावर आधारित तो समस्या सोडवित असतो. त्याने गावातील दोन मुलांना कामधंद्यासाठी मुंबईला पाठविले. राजूशेठ या मित्राबरोबर मुंबईला गेला असता बलाकासीमित साहेबबहादूर यांच्याशी शंभुरावची भेट होते. त्यावेळी साहेबरावची पत्नी उल्फी हिच्याशीही शंभुरावची भेट होते. शंभुराव आणि उल्फीत नात्याचा धागा सापडतो. साहेबराव, शंभुराव, उल्फी असा एकत्रित फोटो काढतात. उल्फीने सांगितल्याने साल्पी गावातील पुरलेले धन शंभुरावला मिळते. शंभुरावची मुले तुळाजी आणि माणकोजी इंग्रजांच्या सैन्यात भरती होतात. यातून घराण्याची पिढी क्षत्रिय परंपरा सांभाळताना आढळते. पुढे स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात तुळाजी पोलीस भरती होतो तर माणकोजी ट्रक ड्रायव्हर म्हणून जातो पण पुढे ट्रक व्यावसायिक होतो. तुळाजी आणि माणकोजी स्वत:च्या बुद्धीने निर्णय घेऊन कर्तृत्व सिद्ध करतात. जानरावप्रमाणे शंभुरावचे शेवटचे दिवस जनावरांच्या गोठ्यात जातात. शंभुराव वयाच्या ऐशींव्या वर्षी मरण पावतो.

देवनाथ हा स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सातपाटील घराण्यातील पुरुष आहे. देवनाथ हाच सातपाटील घराण्याच्या कुलवृत्तांताचा निवेदक आहे. देवनाथ वयाच्या सोळाव्यावर्षी साल्पी गाव सोडतो. आईने संगमनेर या ठिकाणी स्थिर होण्याचा निर्णय घेतला होता. देवनाथने पुणे विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी पूर्ण केली. लेखक म्हणून जन्मत:च प्रतिभा प्राप्त झाल्याने प्रसिद्धी मिळाली. देवनाथ स्वत:ला प्रागतिक विचाराचा समजतो. सातपाटील या आडनावाची उत्सुकता होती त्यातून वडिलांकडून पूर्वजांविषयीची माहिती घेतली. तसेच माहितीचे अनेक स्त्रोत त्याला मिळत गेले. भारतीय लेखकांच्या शिष्टमंडळाचा सदस्य म्हणून ब्रिटनमध्ये गेला असता तिथे सातपाटील घराण्यासंबंधित असणारे रिचर्ड लेसिंग आणि अँथनी ब्लॅकस्मिथ यांच्याकडून पुराव्यासहित माहिती मिळते. रिचर्ड आणि देवनाथ एकमेकांचे नातेवाईक असतात. घराण्याच्या वंशवृक्षाची माहिती मिळविण्यासाठी साल्पी, करंजे, खराडी, वांबोरी या सातपाटील घराण्यांचे वास्तव्य असलेल्या गावापर्यंत पोहचतो. अनेक इतिहासतज्ज्ञ, भाषाभ्यासक यांच्या मतांचा आधार घेतो. थोडक्यात, सातपाटील कुलवृत्तांत' ही कादंबरी म्हणजे सातपाटील घराण्याचा वंश शोधताना बिंदूतून सिंधूचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे ते खरे आहे.

'सातपाटील कुलवृत्तांत' या कादंबरीमध्ये अगदी तेरावे शतक ते एकोणिसावे शतकाच्या त्या त्या कालखंडातील '(जो जो मराठा जिथे जिथे गेला तिथे तो रुजला तिथला झाला पृ.७५५)' 'सामाजिक-राजकीय क्षेत्रातील महत्त्वाच्या व्यक्तिंना साक्षी ठेवून मराठा समूहामध्ये होत गेलेली राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थित्यंतरे मांडली आहेत. विविध मोहिमांच्या निमित्ताने मुलुखगिरी करणारा समाज, भटकंती दरम्यानचे त्याच्या नवीन ग्रामरचनेचे कौशल्य, स्वत:च्या ताकदीवर गाव वसवणे?' स्वतंत्रपणे राहून व्यक्तिमत्त्व घडविण्याची क्षमता, भाऊबंदातील वैर, शेतीधंद्यात लक्ष असणे, अपवादात्मकवेळी वयाच्या उत्तरार्धात वृद्धांची हेळसांड, श्रद्धाळूपणा, रीतीभाती जपण्याची मानसिकता अशी काही मराठा समाजाची वैशिष्ट्ये म्हणून कादंबरीत येतात. कादंबरीतील पुरुष बलदंड शरीरयष्टीचे लढवय्ये कर्तृत्ववान, धाडसी, संतापी, नेतृत्वगुण असणारे, तऱ्हेवाईक, भ्रमिष्ट अशा वैशिष्ट्यांनी युक्त तर स्त्रिया पुरुषांच्या बलदंड शरीरयष्टीवर, शौर्यावर भाळणाऱ्या, कधी स्वछंदी, बौद्धिक, भावनिक सामर्थ्य, शहाणपण असलेल्या आढळतात. कादंबरीत त्या त्या पात्रांच्या अनुषंगाने येणारी ग्रामीण वळणाची भाषा, निवेदनातून येणारी लेखकाची निरीक्षणे आणि चिंतने यातून कादंबरीचे वेगळेपण ध्यानात येते.

सातपाटील कुलवृत्तांत
रंगनाथ पठारे
शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१९, पृ.७९६

◆